दिनांक :     .9.2019

**प्रति,**

**मा. केंद्रीय गृहमंत्री,**

**नवी देहली.**

**विषय : स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या देहली विश्वविद्यालयातील पुतळ्याला काळे फासणाऱ्या अक्षय लाकडा याला अटक करणे आणि राष्ट्रपुरुषांची विटंबना रोखण्यासाठी कायदा करणे यांविषयी ...**

महोदय,

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने नुकताच देहली विश्वविद्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकर, नेताजी सुभाषचंद्र बोस आणि हुतात्मा भगतसिंग या त्रिमूर्तींचे एकत्रित पुतळे बसवले होते. २१ ऑगस्ट २०१९ च्या रात्री काँग्रेसच्या 'नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया' (एन्.एस्.यु.आय.) या विद्यार्थी संघटनेचा देहली अध्यक्ष श्री. अक्षय लाकडा आणि संघटनेचे अन्य देशद्रोही कार्यकर्ते यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्याला चपलांचा हार घालून काळे फासले. ही कृती अतिशय संतापजनक आणि निषेधार्ह आहे. या प्रकरणी देहली पोलिसांनी 'एन्.एस्.यु.आय.'च्या काही कार्यकर्त्यांना अटक केली आणि त्यांना समज देऊन सोडून देण्यात आले. हे पुतळे विश्वविद्यालयाची अनुमती न घेता लावल्याने विश्वविद्यालय प्रशासनाने ते २५ ऑगस्टला हटवले.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे महान क्रांतीकारक, साहित्यिक, लेखक आणि देशभक्त होते. विदेशात जाऊन बॅरिस्टर झालेले असतांना त्यांना स्वतःसाठी अमाप पैसा कमवता आला असता; पण त्यावर पाणी सोडून भारताच्या स्वातंत्र्यासाठी संपूर्ण आयुष्य समर्पित केले; मात्र तत्कालीन काँग्रेस शासनाने त्यांना सापत्नभावाची वागणूक देत त्यांच्याकडे कायम दुर्लक्ष केले. दिवंगत राजीव गांधी यांना भारतरत्न पुरस्कार दिला जातो; मात्र देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून क्रांतीकारक घडवणारे, देशासाठी दोन वेळा जन्मठेपेची शिक्षा भोगलेल्या सावरकरांना मात्र तो मिळत नाही. हे दुर्दैवी आहे.

**तरी या अनुषंगाने आम्ही काही गोष्टी आपल्या निदर्शनास आणून देत आहोत ....**

१. भारताला ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी केवळ सावरकर, नव्हे तर त्यांच्या संपूर्ण कुटुंबियांनी असंख्य वेदना सहन केल्या.

२. वीर सावरकरांनी कुमारवयातच देशाला स्वातंत्र्य मिळण्यासाठी सशस्त्रक्रांती करण्याची शपथ घेतली आणि ती शेवटपर्यंत पाळली. तारुण्य, संसार, घरदार, आयुष्य आदी देशासाठी समर्पण करणारा हा द्रष्टा युगपुरुष होय !

३. बंगालच्या फाळणीच्या विरोधात ७.१०.१९०५ या दिवशी पुणे येथे विदेशी कपड्यांची पहिली होळी करण्यात आली. लोकमान्य टिळक आणि शि.म. परांजपे यांच्या साक्षीने पुण्यात सार्वजनिक रितीने विदेशी कपड्यांची प्रचंड होळी करणारे सावरकर हेच पहिले भारतीय पुढारी होत.

४. त्यांना मृत्यूचे भय कधीच वाटले नाही. इंग्रजांनी त्यांना काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावली; पण त्यांनी अंदमानमधील कारागृहाच्या काळकोठडीतही स्वतःची प्रतिभा जिवंत ठेवली. त्यांनी सहस्रावधी पानांचे वाङ्मय लिहिले आहे. असा युगप्रवर्तक क्रांतीकारक अन्य कोणीही त्या काळात नव्हता.

५. अंदमान येथे कारावास भोगून आल्यावर रत्नागिरीत स्थानबद्ध असतांनाही सावरकरांनी ग्रंथलेखनाव्यतिरिक्त अस्पृश्यता निवारण, भाषाशुद्धी आदी चळवळींसह 'स्वदेशी'वरही लक्ष केंद्रित केले होते.

६. सावरकरांनी देशहितासाठी आणि देशाच्या अस्मितेसाठी कधीही तडजोड केली नाही अन् राष्ट्राभिमान गहाण ठेवला नाही.

७. अशा महान स्वातंत्र्यवीर सावरकरांचा काँग्रेसने स्वातंत्र्यानंतरही १८ वर्षे अपमान केला आणि त्यांच्या मृत्यूनंतरही

आजपर्यंत तो करतच आहे.

८. देहली विश्वविद्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा पुतळा अवैधरित्या उभारला जाणे, हे अयोग्यच आहे; पण श्री. अक्षय लाकडा याने त्यांच्या पुतळ्याला काळे फासणे, हे अतिशय अक्षम्य आहे. यातून श्री. लाकडा याची राष्ट्रपुरुषांप्रतीची चुकीची आणि देशद्रोही मनोवृत्ती दिसून येते.

९. एन्.एस.यु.आय. या विद्यार्थी संघटनेच्या देशद्रोही कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा केलेला अपमान हा केवळ नव्हे, तर संपूर्ण देशाचा; संपूर्ण क्रांतीकारकांच्या चळवळीचा; समस्त देशप्रेमी नागरिकांचा आहे.

**⁕ तरी या प्रकरणी आम्ही पुढील मागण्या करत आहोत ....**

१. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी अक्षम्य अपराध करणारा 'एन्.एस्.यु.आय.' श्री. अक्षय लाकडा याला पोलिसांनी तात्काळ अटक करावी. त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून कठोरात कठोर कारवाई करावी.

२. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा हा अपमान कायमचा थांबवण्यासाठी त्यांना 'भारतरत्न' जाहीर करावे.

३. राष्ट्रपुरुषांच्या स्मारकांची विटंबना करणाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याचा नवा कायदा बनवून देशविरोधी शक्तींवर वचक बसवावा.

४. अंदमान येथील स्वा. सावरकर यांच्या ओळी काढण्यात आल्या आहेत, त्या लावण्यासाठी केंद्र सरकारने पुढाकार घ्यावा.

५. फ्रान्स सरकारशी चर्चा करून मार्सेलिस येथे स्वातंत्र्यवीर सावकरांचे भव्य स्मारक बनवावे.

आपला विश्वासू,

संपर्क :